वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क. पोउपआ/वाहि/वाहतूक अधिसूचना/२८७/२०२५ दि. २८/१२/२०२५

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये **वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत ठाणे महानगरपालिका ठाणेच्या सार्वत्रिक निवडणूका २०२५ जाहीर झालेल्या असून वागळे प्रभाग समिती प्रभाग क्र.१६, १७, १८ निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, औदयोगिक प्रशिक्षण संस्था, आ.टी.आय. सर्कल, वागळे इस्टेट ठाणे येथे दिनांक ३१/१२/२०२५ रोजी पर्यत नामनिर्देशन अर्ज भरण्याकरीता उमेदवार, उमेदवार प्रतिनिधी तसेच रॅली, रोड शो करीता जास्तीचे नागरीक आणि वाहने येण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	१) २२ नं. सर्कलकडून आयटीआय कडे रोडने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **२७ नं.चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने २७ नं.चौक येथून डावीकडे वळून श्रीनगर/शांतीनगर मार्गे किंवा उजवीकडे वळून सीपी तलाव मार्गे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) शांतीनगर व रामनगर मार्गे आयटीआय कडे रोडने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **धर्मवीर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही शांतीनगर, महिंद्रा शोरुम कट व रामनगर, वागळे बस डेपो मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना **दिनांक २९/१२/२०२५ रोजी ते दिनांक ३१/१२/२०२५ रोजी सकाळी ०९:०० वा. ते सायंकाळी १८:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावी